सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) घटकातील सर्वसाधारण प्रवर्गासाठी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध केलेला ₹९५.९७४९ कोटी इतका अतिरिक्त निधी वितरित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: कृवपदुम-२५०३७/५/२०२५-MAG-१४A**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ फेब्रुवारी, २०२६

संदर्भ:-

१. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेली ३७ व्या राज्य स्तरीय मंजुरी समितीची बैठक दिनांक २४.०३.२०२५.
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: केंपुयो-२०२५/प्र.क्र.१४/२-अे, दिनांक ०३.०४.२०२५.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५.
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्र. विघयो-२०२५/ प्र.क्र.५८/ अर्थसंकल्प, दिनांक १५.०४.२०२५.
५. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.०२/कार्यासन-६, दिनांक २१.०४.२०२५.
६. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: कृवपदुम-२५०३७/५/२०२५-MAG-१४A, दिनांक २२.०४.२०२५.
७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक २९.०४.२०२५.
८. कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०२५-RKVY दिनांक ३०.०४.२०२५.
९. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: कृवपदुम-२५०३७/५/२०२५-MAG-१४A, दिनांक ०९.०५.२०२५.
१०. संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे क्र.कृआ प्रकरण क्र.५६/फलो-४/२०२५-२६/पुरक मागणी/ R-३५१/२०२५, दि.२९.१०.२०२५
११. कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०२५-RKVY दिनांक २१.०१.२०२६.
१२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र: कृवपदुम-२५०३७/५/२०२५-MAG-१४A, दिनांक ०५.०२.२०२६.

**<u>प्रस्तावना</u>:-**

सन २०१५-१६ पासून प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक ०६ एप्रिल, २०२२ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजना-रफ्तार ची राष्ट्रीय कृषि विकास योजना-कॅफेटेरिया या नावाने पुनर्ररचना केली असून त्यामध्ये वार्षिक कृती आराखडा आधारित व सविस्तर प्रकल्प अहवाल आधारित या दोन शाखांचा समावेश आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेतील प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) हा घटक प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना वार्षिक कृती आराखडा आधारित शाखेत अंतर्भूत केली असून केंद्र व राज्य हिश्श्याच्या निधीचे प्रमाण ६०:४० असे आहे. केंद्र शासनाच्या दिनांक २०.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेचे नाव प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना असे करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय मंजुरी समितीने (वार्षिक कृती आराखडा आधारित) दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या घटकाकरिता ₹५९६५८.३३ लक्ष निधीच्या कार्यक्रमास दिलेल्या मान्यतेनुसार संदर्भ क्र. ६ येथील दिनांक २२.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) योजनेच्या ₹ ५९६५८.३३ लक्ष च्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

यापूर्वी संदर्भ क्र.९ येथे नमूद दि.०९.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेकरिता पहिला हप्ता हा सर्वसाधारण प्रवर्ग, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या तिनही प्रवर्गासाठी एकूण रू.२५१.४१६६६६६ कोटी इतका निधी व संदर्भ क्र.११ अन्वये रू.१७८.११६६६६६ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

संदर्भ क्र.१० येथे नमूद दि.२९.१०.२०२५ रोजीच्या कृषि आयुक्तालय, पुणे यांच्या पत्रान्वये प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गासाठी पुरवणी मागणीद्वारे ₹ ९५.९७४९ कोटी इतक्या निधीची मागणी केली होती. तदनुसार, विधानमंडळाच्या डिसेंबर, २०२५ च्या तृतीय अधिवेशनात प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गासाठी पुरवणी मागणीद्वारे ₹ ९५.९७४९ कोटी (केंद्र हिस्सा ₹ ५७.५८५० कोटी + राज्य हिस्सा ₹ ३८.३८९९ कोटी) इतक्या निधीची मागणी सादर करण्यात आली होती. तद्नुषंगाने, उपलब्ध झालेला रु.९५.९७४९ कोटी इतका अतिरिक्त निधी प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गासाठी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

विधानमंडळाच्या डिसेंबर, २०२५ च्या तृतीय अधिवेशनात प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गासाठी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध केलेला ₹ ९५.९७४९ कोटी (रुपये पंच्याण्णव कोटी सत्याण्णव लक्ष एकोणपन्नास हजार फक्त) इतका अतिरिक्त निधी आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | योजनेंतर्गत मंजूर घटक | वितरीत निधी | | |
|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | एकूण |
| १. | राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) या योजनेतील सर्वसाधारण प्रवर्गासाठी | ५७.५८५० | ३८.३८९९ | ९५.९७४९ |

०२. उपरोक्तनुसार प्रवर्गनिहाय वितरित निधी केंद्र हिस्सा व राज्य हिश्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०२५-२६ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदींतून खर्च करण्यात यावा.

| सर्वसाधारण प्रवर्ग | |
|---|---|
| केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा |
| मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>११३, कृषि अभियांत्रिकी<br>(००) (०७) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (सर्वसाधारण) (कार्यक्रम)<br>(२४०१ २५०४),<br>३३, अर्थसहाय्य | मागणी क्र. डी-३<br>२४०१ पीक संवर्धन<br>११३, कृषि अभियांत्रिकी<br>(००) (२१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) (कें.पु.यो.) (राज्य हिस्सा ४० टक्के) (सर्वसाधारण) (कार्यक्रम)<br>(२४०१ ए९९६),<br>३३, अर्थसहाय्य |

०३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीचे वितरण करण्याकरिता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांना नियंत्रण अधिकारी व सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी खर्च करताना प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे, तसेच, संदर्भ क्र. १० येथे नमूद केंद्र शासनाच्या दिनांक २१.०१.२०२६ रोजीचा पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

०५. लाभार्थ्यांना अनुदान वाटप करताना शासनाद्वारे वेळोवेळी विहीत केल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड महा-डीबीटी प्रणालीद्वारे करण्यात यावी व लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप आधार संलग्न बँक खात्यावर करण्याकरिता सार्वजनिक वित्त व्यवस्थापन प्रणालीचा वापर करावा.

०६. सदर निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास पाठवून त्याची प्रत राज्य शासनास पाठवावी.

०७. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७.०४.२०२५, सामाजिक न्याय विभाग दि. १५.०४.२०२५, आदिवासी विकास विभागाच्या दि. २१.०४.२०२५ आणि दिनांक २९.०४.२०२५ शासन परिपत्रकान्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन व सदर परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता करुन निर्गमित करण्यात येत आहे.

०८. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अनौसं-४२१/२०२५/व्यय-१, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०२१६११३२५५३४०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and ADF Department, 2.5.4.20=8EC4809BF7E642CE22FDACB42A63CA8410ADE167476AC90F3C879FACBF715A09, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4D8A55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2026.02.16 11:59:19 +05'30'

**(अं.सा. चंदनशिवे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास, औकाफ विभाग), महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई.

८) सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य /महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
९) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
१०) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) अपर मुख्य सचिव (पशुसंवर्धन) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, एपीजे हाऊस, मुंबई.
१७) राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१८) संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
१९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२१) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
२२) महालेखापाल महाराष्ट्र (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
२३) वित्त विभाग (व्यय- १/अर्थसंकल्प १३), मंत्रालय, मुंबई.
२४) नियोजन विभाग (का-१४३१), मंत्रालय, मुंबई.
२५) सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२७) निवडनस्ती (१४-अे कार्यासन) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.